अमरावती शहरात लावण्यात आलेल्या संचारबंदीत सामान्य लोकांचे जिवनावश्यक वस्तु फळे इत्यादीचा त्रास लक्षात घेता सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून श्री. संजयकुमार बाविस्कर (पोलीस आयुक्त, अमरावती) यांच्या संकल्पनेतुन व श्री शैलेश नवाल (जिल्हाधिकारी,अमरावती.) · श्री. रोडे (म.न.पा.आयुक्त अमरावती), संदीप जाधव, (जिल्हा उपनिबंधक) जिल्हा कृषि अधिकारी श्री. चव्हाडे, तसेच अमरावती शहरातील सामाजिक कार्यकर्ते इत्यादींच्या विद्यमानाने शहरातील विविध भागांत घरपोच फळे व भाजीपाला देण्याची योजना आखली आहे. अमरावती शहराचा विस्तार व भौगोलीक क्षेत्र बघता सर्वांना दैनंदिन साहित्य घरपोच पोहोचविणे आव्हानात्मक आहे.

तरी, देखील प्रशासन तर्फे जनतेच्या सोयीसाठी शहरातील वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळया दिवशी घरपोच भाजीपाला व फळांचा पुरवठा दि. २९.०४.२०२० चालु करण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner